जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०९/०१/२०२४
## दि.०८/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ४०/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय २३ वर्षे,रा.महादेवनगर,मांजरी-खुर्द,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०२/०१/२०२४ रोजी ०६/०० वा.मांजरी ओव्हर ब्रिज,मांजरी,महादेवनगर रोड,ता.हवेली जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणाहुन मोबाईल फोनवर बोलत जात असताना,यातील नमुद तीन अनोळखी इमसांनी अपसात संगनमत करुन,फिर्यादी यांचे पाठीमागुन येवुन,त्यांचे हातातील मोबाईल फोन ८,०००/- रू किचा जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सावळे ९९७०८१८१०१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे २०/२०२४,भादविक ३५३,३२३,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | एक टेक्नीशियन अधिकारी,एमएसईडीसीएल,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०१/२०२४ रोजी सकाळी ११/४० वा.प्लॉट नं.७५,गॅलेक्झी प्रीमियम सोसायटी समोर कौसरबाग,कोंढवा, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे एमएसईडीसीएल मध्ये सिनीयर टेक्नीशियन या पदावर आहेत. फिर्यादी यांना मिटर डिसकनेक्शनची डयुटी असल्याने,त्यांचे सहकारी (टेक्नीशीयन) यांचेसह कौसर बाग भागातील प्लॉट नं.७५,कौसरबाग कोंढवा पुणे येथील महीला फ्लॅट नं. व फ्लॅट नं.४ यांचे नावाने असलेले मीटर त्यांच्या घरी स्वतः जाऊन,त्यांना तसे सांगुन दोन्ही मिटर कट केले व त्यांचे नावे असलेले फ्लॅट नं.ई/२/१०३ येथील मीटर कट करण्यासाठी गेले असताना,यातील नमुद इसमाने त्याचे हातात फायबरचा गोल पाईप घेऊन येवुन,फिर्यादीचे अंगावर धावुन येवुन त्यांना धक्का-बुक्की करून,अपशब्द वापरुन,तुझा हातच तोडतो अशी धमकी दिली. त्यावेळी फिर्यादी यांचे सहकारी (टेक्नीशीयन) हे मध्ये आले असता,त्यांनाही धक्का-बुक्की करून, अपशब्द वापरुन, फिर्यादी यांचे सरकारी कामात अडथळा आणुन,त्यांना काम करण्यापासुन रोखले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, सुकेशिनी जाधव ९९२१४९८०८६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ४१/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ३३ वर्षे,रा.धानोरी,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०१/१/२०२४ रोजी २०/०० वा.मगरपट्टा ब्रिज जवळील रांका ज्वेलर्स दुकाना समोर,हडपसर,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा पुतण्या कृष्णकांत गिलडा,वय-२२ वर्षे हा असताना,यातील नमुद तीन अनोळखी इमसांनी अपसात संगनमत करुन,फिर्यादी यांचे पाठीमागुन येवुन,त्यांचे हातातील मोबाईल फोन २०,०००/- रू किचा जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरीक्षक, दोरकर ९८९२५५५८८१ |

**४**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी-काळभोर पो स्टे २०/२०२४,भादविक ३०४(अ),३३८,२७९,मो.वा.क.११९/१७७,१३२, १८४ |
| **फिर्यादी** | सागर गायकवाड,वय-३५ वर्षे,रा.कुंजीरवाडी,नायगांव फाटा,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात वाहनावरील अज्ञात चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०७/०१/२०२४ रोजी १०/३० वा.पुणे-सोलापुर हायवे,नायगांव चौक,कुंजीरवाडी,हवेली, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा चुलत भाऊ लखन बाळु गायकवाड,वय-३६ वर्षे,रा.सदर हा नमुद ठिकाणी पायी रस्ता ओलांडत असताना,पुणेकडुन सोलापुरकडे जाणा-या अज्ञात वाहनावरिल अज्ञात चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने, अविचाराने व बेदरकारपणे चालवुन,नमुद ठिकाणी पादचारी इसम लखन गायकवाड यास जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अमोल घोडके ८८८८८२४२०० |

## <u>दि.०९/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ०४/२०२४,भादविक ३०७,३२६ |
| **फिर्यादी** | संजय बर्डे, पोलीस अंमलदार, विश्रांतवाडी पोलीस ठाणे, पुणे शहर |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०१/२०२४ रोजी रात्री २३/१० वा.सार्वजनिक रोडवर,विश्रांतवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने अमीर सैय्यद यास जीवे मारण्याच्या उद्देशाने,कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन,अमीर याचे डोक्यात दगड मारुन,त्यास गंभीर जखमी करुन,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, शरद माळी ९८२३७१७०८० |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ०९/२०२४,भादविक ३०७,३३६,३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | अश्रफ पठाण,रा.अंगरशहा तकिया,भवानी पेठ,पुणे |
| **आरोपीत** | तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०१/२०२४ रोजी रात्रौ ०२/०० वा. ढोर गल्ली,गणेश पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र इब्राहीम याचेसह त्यांचे राहते घरी पायी जात असताना, यातील नमुद तीन इसमांपैकी एका इसमाने फिर्यादी व इब्राहीम यांना रस्त्यात थांबवुन,त्यांना शिवीगाळ करून,तुम कहाँ रहते हो असे म्हणून रस्त्यातील दगड त्यांचे दिशेने फेकून मारला. त्यानंतर काही वेळाने फिर्यादी हे त्यांचे सोबत इतर साथीदार यांना घेवुन ढोर आळीत शिवीगाळ करणा-या सदर इसमांना जाब विचारण्याकरीता गेले असता,त्यांनी फिर्यादी व त्यांचे सोबतचे इसमांना पुन्हा शिवीगाळ करून,यहाँ वापस क्यु आए मरने को असे म्हणून फिर्यादी सोबत असलेला एक अल्पवयीन मुलगा,वय-१७ वर्ष,रा.काशेवाडी,भवानी पेठ,पुणे यास जीवे ठार मारण्याचे उद्देशाने आज इसको जिंदा नही छोडेंगे असे म्हणुन त्यांचेकडील धारधार शस्त्राने त्याचे पोटावर,पाठीवर आणि हातावर मारुन,त्यास गंभीर जखमी करुन,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सुरज कुतवळ ८६६८२९३००३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**